# लोकराजा
# राजर्षी शाहू



संपादक

प्रा.डॉ. डी.टी. घटकार    प्रा. जे.एल. जायेवार

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

# अनुक्रमणिका


१. युगप्रवर्तक राजा- राजर्षी शाहू महाराज ........... २१
**प्राचार्य डॉ.बी.टी.लहाने**

२. राजर्षी शाहूंची सामाजिक न्यायाची रीत ........... २६
**डॉ. नारायण तु. कांबळे**

३. राजर्षी शाहू महाराजांचे बहुजन समाजासाठी शैक्षणिक कार्य ......... ४२
**प्राचार्य डॉ. गोरोबा खुरपे**

४. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य ........... ४६
**प्रा. डॉ. सौ. सुषमा विश्वरत्न तायडे (अहिरे)**

५. छत्रपती राजर्षी शाहु महाराज यांचे शिक्षण क्षेत्रातील मौलिक योगदान : एक अभ्यास ........... ५१
**डॉ. गित्ते ए.एन.**

६. राजर्षी शाहू महाराजाचे शिक्षण विषयक धोरण ........... ५८
**प्रा.डॉ.आसिया चिश्ती**

७. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य ........... ६६
**प्रा.डॉ.बोचरे जे.एम., पल्लेवार के.डी.**

८. राजर्षी शाहु महाराजाचे शिक्षणविषयक विचार व कार्य ........... ७१
**श्री.राजकुमार तुकाराम राठोड (स.शि.)**

९. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षणविषयकविचार व कार्य ........... ८३
**प्रा. मोहन बाबुराव चव्हाण**

१०. राजर्षी शाहू महाराजाचे शैक्षणिक कार्य : एक दृष्टीक्षेप ........... ९५
**सहा. प्रा. सौ. पाटील जयश्री जेजेराव**

११. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य ........... ९९
**प्रा. प्रदीप तुळशीराम पाटील**

१२. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार ........... १०७
**सचिन गुंडीराम डेंगळे**

१३. राजर्षी शाहु महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य ........... ११०
**प्रा. किर्दत विलास गोपीनाथराव**


ISBN 978-93-5240-161-1



Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani


१४. राजर्षी शाहू महाराजांचे शिक्षण विषयक विचार व कार्य ........... ११३
**प्रा. लंजिले प्रदिप मारुती**

१५. शाहु महाराजांचे शिक्षणविषयक विचार व कार्य ........... ११७
**प्रा.डॉ.डी.टी.घटकार**

१६. वसतिगृह चळवळीचे प्रणेते राजर्षी शाहू महाराज ........... १२१
**प्रा. डॉ. बी.के. मोरे, प्रा. डॉ. संतोष पाटील**

१७. राजर्षी शाहु महाराजांच्या स्त्री विषयक दृष्टीकोणाचे समाजशास्त्रीय अध्ययन ........... १२९
**प्रा.डॉ.तंगलवाड दत्ता माधवराव**

१८. राजर्षी शाहू महाराजांचे महिलाविषयक सामाजिक कार्य ........... १३५
**प्रा.मधुवाला गंगाधरराव हुडगे**

१९. राजर्षी शाहू महाराजांचे स्त्रिविषयक विचार व कार्य ........... १४१
**प्रा. वनमाला धोंडीराम तरकसे**

२०. राजर्षी शाहू महाराजांचा स्त्रिविषयक दृष्टीकोन ........... १५०
**प्रा. श्रीमती कल्पना शामराव सोनवणे**

२१. राजर्षी शाहू महराजांचे स्त्री विषयक विचार व कार्य ........... १५६
**नीता मोहनराव मोरे**

२२. राजर्षी शाहू महाराज आणि स्त्री जातीच्या सरंक्षणाचे कायदे ........... १६३
**प्रा. संध्या एम. पाटील**

२३. राजर्षी शाहु महाराज आणि स्त्री विषयक विचार व कार्य ........... १६८
**प्रा. गायकवाड पी.के.**

२४. लोककल्याणकारी राजा छत्रपती शाहू महाराज ........... १७२
**डॉ. दुष्यंत मनोहर कटारे**

२५. राजर्षी शाहु महाराजांचे समाज सुधारणा विषयक कार्य ........... १७६
**प्रा.स्वामी जयश्री जयतीर्थ**

२६. राजर्षी शाहू महाराज यांचे सामाजिक योगदान ........... १७९
**प्रा.डॉ.वनमाला लोंढे**

२७. सामाजिक समतेचे अध्वर्यू - राजर्षी शाहू महाराज ........... १८६
**प्रा.डॉ. दिलीपसिंह निकुंभ**

२८. समतावादी नेतृत्व : राजर्षी शाहू महाराज ........... १९५
**प्रा. अरुण अवचितराव पाटील**


ISBN 978-93-5240-161-1

२९. राजर्षी शाहू महाराजांचे लोक कल्याणकारी कार्य ........... २००

**प्रा. रमेश आसाराम वाघ**

३०. सामाजिक न्यायाचे कालातीत नेतृत्व : राजर्षी शाहू महाराज ........ २०७

**डॉ. एन. पी. कुडकेकर**

३१. राजर्षी शाहू महाराजांचे लोक कल्याणकारी कार्य ........... २१२

**प्रा. ससाणे सतीश गंगाराम**

३२. राजर्षी शाहु महाराजांचे लोककल्याणकारी कार्य ........... २१८

**प्रा.राणी जाधव-गायकवाड, प्रा.राणी जाधव**

३३. राजर्षी शाहु महाराज : लोक कल्याणकारी राजा ........... २२६

**सहा. प्रा. संगिता गंगाराम उतेकर**

३४. राजर्षी शाहू महाराज : बहूजन समाज उद्धारक ........... २३३

**प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)**

३५. राजर्षी शाहू : एक भारतीय समाजशास्त्रज्ञ ........... २३८

**सहा.प्रा.सौ. सोमवंशी अल्का बाबाराव**

३६. राजर्षी शाहू महाराज यांची ब्राम्हणेत्तर चळवळीतील भूमिका ........... २४७

**प्रा. डॉ. बाबासाहेब केशवराव शेप, मुंडे दत्तात्रय रामकिशनराव**

३७. राजर्षी शाहू महाराज आणि अस्पृश्यता निर्मूलन ........... २५८

**स.प्रा.हंगरगे यशवंत रामराव**

३८. राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्य उध्दाराचे कार्य ........... २६३

**प्रा.डॉ.तानाजी लोखंडे**

३९. राजर्षी शाहू महाराज आणि धर्मनिरपेक्षता ........... २६८

**प्रा.कुडमते विलास देवराव**

४०. राजर्षी शाहू महाराज व बहुजन समाज ........... २७३

**सहा. प्रा. डॉ. शिंदे अनंत नामदेवराव**

४१. छत्रपती राजर्षी शाहु महाराजांचे परिवर्तनवादी विचार व कार्य ...... २७७

**प्रा. कोटरंगे दत्ता नामदेव**

४२. राजर्षी शाहू महाराज आणि अस्पृश्यता निर्मुलन ........... २८५

**डॉ. गाजरे विलास अण्णाराव**

४३. राजर्षि शाहू महाराजांचे समाजोन्नत्तीचे तत्त्वज्ञान - एक दृष्टिकोन ....... २९२

**प्रा. नरवाडे बालाजी मारोतराव**

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani

ISBN 978-93-5240-161-1

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



३४.

# राजर्षी शाहू महाराज : बहूजन समाज उद्‌धारक

**प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)**
लोकप्रशासन विभाग प्रमुख
कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी
ई-मेल -somvanshimukta७६@rediffmail.com
मो - ९४२००३५७७९

---

**प्रस्तावना :**

राष्ट्रमाता जिजाऊनी शाहाजी राजांच्या प्रणेतून बालशिवबांवर असे काही संस्कार केले की, त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मावळ्यांमध्ये एक विश्वास निर्माण करून स्वराज्याची स्थापना केली. जीजाऊंच्या मार्गदर्शनाखाली हिंदवी स्वराज्याची स्थापना करून आपल्या जनतेची आत्याचारातून मुक्तता केली. आपल्या राज्यात प्रत्येक व्यक्तीला न्याय मिळाला पाहिजे त्याचबरोबर कोणावरही अन्याय होणार नाही याची खबरदारी छत्रपती शिवाजी महारांनी घेतली होती. आपल्या राज्यातील जनतेमध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता समतेचे व न्यायाचे तत्व अंगीकारले होते.

राजर्षी शाहू महाराजांनी छत्रपतींचा वारसा सांभाळत शिवछत्रपतीची राजकीय तत्वप्रणाली आमलात आणून कलानुरूप छत्रपतीच्या राजकीय तत्वप्रणालीचा विकास केला, असे म्हणता येईल. प्रस्तूत लेखात राजर्षी शाहू महाराजांची आपल्या राज्यातील सर्वसामान्य जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीने घेतलेल्या निर्णयांचा व कायद्यांचा अभ्यास करण्यात आला आहे. राजर्षी शाहू महाराज हे सर्वसामान्यंचे शासक होते. त्यांनी आपल्या संस्थानातील मागासलेल्या लोकांचा उद्धार करण्यासाठी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले, धोरणे ठरविले व कायदे केले. धर्माच्या नावाखाली सुरू असलेल्या अयोग्य प्रथा बंद करून नवीन मानवतावादी पायंडे पाडण्याचा सर्वस्वी प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केला. त्यामुळे राजर्षी शाहू महाराज हे खऱ्याअर्थाने बहुजन समाज उद्धारक ठरतात.

ISBN 978-93-5240-161-1

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta Sonpeth Dist. Parbhani



**१) अधिकार ग्रहण :-**

राजर्षी शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी अधिकार ग्रहण करताना असे जाहीर केले की, आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावेत. त्यांच्या हिताची एकसारखी वृध्दी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजुंनी अभ्युदय व्हावा, अशी आमची उत्कट इच्छा आहे. यासाठी सर्वांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हाला आवश्यकता आहे.[१] त्यांच्या या घोषणेवरून त्यांचा जनतेप्रती असलेली दृष्टीकोन स्पष्ट होतो. तसेच राजासाठी जनता ही किती महत्वाची असते हे ही स्पष्ट होते.

राजर्षी शाहू महाराजांनी सत्ताग्रहण केले त्यावेळी संस्थानातील बहुजन जनतेसाठी अतिशय प्रतिकूल वातावरण होते. कारण संस्थानावर इंग्रजाचे वर्चस्व होते. संस्थानातील सर्व वरिष्ठ अधिकारपदांवर युरोपीयन अथवा संस्थाना बाहेरील लोक होते. बहुजन समाजातील एकही व्यक्ती उच्च अधिकारपदी नव्हती. अशा परिस्थितीत शाहू महाराजांना निर्णय घेणे फार कठिण होते. कारण राजर्षी शाहू महाराजांच्या अगोदरच्या छत्रपतीना सतत इंग्रजाशी संघर्ष करावा लागला यामुळे जनतेच्या समस्या सोडविणे शक्य नव्हते. तेव्हा शाहू महाराजांनी दूरदृष्टीने विचार करून इंग्रजांशी सकहार्य करून आपणास प्राप्त झालेल्या अधिकाराचा बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयोग करण्याचा महत्वाचा मार्ग स्विकारला. त्यांच्या मते, स्वराज्य तर हवेच, तथापि त्या अगोदर सुराज्य निर्माण होणे, लोकशाही येण्यासाठी बहुजन समाजात जागृती येणे अतिशय आवश्यक आहे.[२] कारण बहुजन समाजात जागृती न झाल्यास येणाऱ्या स्वराज्याचे फायदे जातिसंस्थेतील केवळ वरिष्ठ जातींनाच मिळण्याची व बहुजन समाज त्यापासून वंचित राहण्याची शक्यता महाराजांना जाणव होती. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाराजांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. ज्यामुळे संस्थनातील बहुजन लोकांना त्यांचे फायदे मिळण्यास मदत झाली.

**२) शिक्षणविषयक कार्य :-**

बहुजन समाजाच्या उद्धाराच्या दृष्टीने महाराजांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्वाचे आहे. कारण ज्योतीबांना शिक्षण मिळाले म्हणून त्यांनी भारतात समाजिक क्रांती घडवुन आणली आणि समाजासाठी ते क्रांतीसुर्य ठरले. महात्मा ज्योतीबांच्या विचारांचा प्रभाव शाहू महाराजांवर होताच, दूरदृष्टी होती आणि जनकल्याणाची व न्यायप्रस्थापित करण्याची तळमळ होती. बहुजन समाजातील असंख्य लोक अज्ञान व दारिद्र्याचे जीवन जगत होते. छत्रपती शाहू महाराजांनी या अज्ञानी

ISBN 978-93-5240-161-1

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta Sonpeth Dist. Parbhani



[illegible] ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निश्चित केला.[३] बहुजन समाजाला, [illegible] सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च [illegible] उपलब्ध करण्याचे धोरण त्यांनी आखले. बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या सर्व अडचणींवर मात करण्याचे महाराजांनी ठरविले यासाठी सक्तीचे व मोफत शिक्षणाचे धोरण स्वीकारले. २१ नाव्हेंबर १९१७ रोजी काढलेल्या जाहिरनाम्यातून कोल्हापूर संस्थानातील प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. महाराजांनी १९१८ मध्ये शिक्षणविषयक कराचा कायदा केला. दरमहा शंभर रूपयापेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या व्यक्तींवर हा शिक्षणकर बसविला. तसेच लहान व मोठ्या गावांतून घरटी आठ आणे व एक रूपया शिक्षण कर वसूल करण्यास सुरूवा केली. सन १९१९ मध्ये त्यांनी अस्पृश्यांच्या मुलांना सरकारी शाळेमधून दाखल करून घ्यावे असे धोरण जाहीर केले. समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी सर्वस्वी प्रयत्न केले.

**३) अस्पृश्यता दूर करण्यासाठी केलेल्या उपाययोजना :-**

अस्पृश्यता म्हणजे मानवजातीला लागलेला कलंक असून समाजाच्या दृष्टीने तो हानिकारक आहे. याची जाणीव महाराजांना होती. राजर्षी शाहू महाराजांच्या मते, 'अस्पृश्यांना दारिद्र्याच्या चिखलातून बाहेर काढणे. हे माझे पवित्र कार्य आहे' अस्पृश्यता निवारण्याच्या या कार्यासाठी त्यांनी निरनिराळ्यस अस्पृश्यांना संस्थानाच्या नोकरीत सामावुन घेण्यास, त्यांना प्रगतीची संधी देण्यास व सामाजिक प्रतिष्ठा देण्यास सुरूवात केली. त्यांनी महार समाजातील काहींना माहूत म्हणून कामावर घेतले. आपली कन्या राधाबाईसाहेब यांच्या विवाह सोहळ्याच्या वेळी वरातीत सरकारी घोडागाडीवर अस्पृश्य व्यक्तीला कोचमन म्हणून बसविले. महाराजांनी बलुतेदारी व वेठगिरीची पध्दत कायद्याने बंद केली.

**४) हजेरी देण्याची पध्दत बंद :-**

राजर्षी शाहू महाराजंनी अस्पृश्य समजले जाणाऱ्यां लोकांना सन्मानाने जीवन जागता यशवे यासाठी अनेक कायदे केले. त्यातीलच एक महत्वाचा कायदा म्हणजे हजेरी देण्याची पध्दत बंद करण्याचा कायदा होय. त्याकाळी गुन्हेगारी जातीच्या लोकांची हजेरी दररोज पोलीस पाटलांकडे होती. यामुळे या जातीच्या लोकांची मोठी गैरसोय होती. पोलीस पाटील त्यांच्याकडून विना मूल्य काम करून घेत असत. यामुळे त्यांच्या कुटूंबाच्या पोटापाण्याची व्यवस्थाही होत नसे. महाराजांनी ही अडचण दूर करण्यासाठी महार, मांग, रामोशी व बरड या चार जातींच्या लोकांची हजेरी बंद करण्याचा आदेश काढला.

ISBN 978-93-5240-161-1

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth Pin-431516
Tq. Sonpeth Dist. Parbhani



**१) अधिकार ग्रहण :-**

राजर्षी शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी अधिकार ग्रहण करताना असे जाहीर केले की, `आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावेत. त्यांच्या हिताची एकसारखी वृध्दी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजुंनी अश्युदय व्हावा, अशी आमची उत्कट इच्छा आहे. यासाठी सर्वांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व सहकार्याची आम्हाला आवश्यकता आहे.[१] त्यांच्या या घोषणेवरून त्यांचा जनतेप्रती असलेली दृष्टीकोन स्पष्ट होतो. तसेच राजासाठी जनता ही किती महत्वाची असते हे ही स्पष्ट होते.

राजर्षी शाहू महाराजांनी सत्ताग्रहण केले त्यावेळी संस्थानातील बहुजन जनतेसाठी अतिशय प्रतिकूल वातावरण होते. कारण संस्थानावर इंग्रजाचे वर्चस्व होते. संस्थानातील सर्व वरिष्ठ अधिकारपदांवर युरोपीयन अथवा संस्थाना बाहेरील लोक होते. बहुजन समाजातील एकही व्यक्ती उच्च अधिकारपदी नव्हती. अशा परिस्थितीत शाहू महाराजांना निर्णय घेणे फार कठिण होते. कारण राजर्षी शाहू महाराजांच्या अगोदरच्या छत्रपतींना सतत इंग्रजाशी संघर्ष करावा लागला यामुळे जनतेच्या समस्या सोडविणे शक्य नव्हते. तेंव्हा शाहू महाराजांनी दूरदृष्टीने विचार करून इंग्रजांशी सकहार्य करून आपणास प्राप्त झालेल्या अधिकाराचा बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी उपयोग करण्याचा महत्वाचा मार्ग स्विकारला. त्यांच्या मते, `स्वराज्य तर हवेच, तथापि त्या अगोदर सुराज्य निर्माण होणे, लोकशाही येण्यासाठी बहुजन समाजात जागृती येणे अतिशय आवश्यक आहे.[२] कारण बहुजन समाजात जागृती न झाल्यास येणाज्या स्वराज्याचे फायदे जातिसंस्थेतील केवळ वरिष्ठ जातींनाच मिळण्याची व बहुजन समाज त्यापासून वंचित राहण्याची शक्यता महाराजांना जाणव होती. ही परिस्थिती बदलण्यासाठी महाराजांनी अनेक महत्वपूर्ण निर्णय घेतले. ज्यामुळे संस्थनातील बहुजन लोकांना त्यांचे फायदे मिळण्यास मदत झाली.

**२) शिक्षणविषयक कार्य :-**

बहुजन समाजाच्या उद्धाराच्या दृष्टीने महाराजांचे शैक्षणिक कार्य अतिशय महत्वाचे आहे. कारण ज्योतीबांना शिक्षण मिळाले म्हणून त्यांनी भारतात समाजिक क्रांती घडवुन आणली आणि समाजासाठी ते क्रांतीसुर्य ठरले. महात्मा ज्योतीबांच्या विचारांचा प्रभाव शाहू महाराजांवर होताच, दूरदृष्टी होती आणि जनकल्याणाची व न्यायप्रस्थापित करण्याची तळमळ होती. `बहुजन समाजातील असंख्य लोक अज्ञान व दारिद्र्याचे जीवन जगत होते. छत्रपती शाहू महाराजांनी या अज्ञानी

ISBN 978-93-5240-161-1

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth Pin-431516
Tq. Sonpeth Dist. Parbhani



बहुजन समाजातील ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचा निश्चित केला.[३] बहुजन समाजाला, स्त्रियांना सुशिक्षित करण्यासाठी प्राथमिक शिक्षणापासून उच्च [illegible] उपलब्ध करण्याचे धोरण त्यांनी आखले. बहुजन समाजाच्या शैक्षणिक प्रगतीत येणाऱ्या सर्व अडचणींवर मात करण्याचे महाराजांनी ठरविले यासाठी सक्तीचे व मोफत शिक्षणाचे धोरण स्वीकारले. २१ नाव्हेंबर १९१७ रोजी काढलेल्या जाहिरनाम्यातून कोल्हापूर संस्थानातील प्राथमिक शिक्षण सक्तीचे करण्यात आले. महाराजांनी १९१८ मध्ये शिक्षणविषयक कराचा कायदा केला. दरमहा शंभर रूपयापेक्षा अधिक उत्पन्न असलेल्या व्यक्तींवर हा शिक्षणकर बसविला. तसेच लहान व मोठ्या गावांतून घरटी आठ आणे व एक रूपया शिक्षण कर वसूल करण्यास सुरूवा केली. सन १९१९ मध्ये त्यांनी अस्पृश्यांच्या मुलांना सरकारी शाळेमधून दाखल करून घ्यावे असे धोरण जाहीर केले. समाजातील अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी सर्वस्वी प्रयत्न केले.

**३) अस्पृश्यता दूर करण्यासाठी केलेल्या उपाययोजना :-**

अस्पृश्यता म्हणजे मानवजातीला लागलेला कलंक असून समाजाच्या दृष्टीने तो हानिकारक आहे. याची जाणीव महाराजांना होती. राजर्षी शाहू महाराजांच्या मते, `अस्पृश्यांना दारिद्र्याच्या चिखलातून बाहेर काढणे. हे माझे पवित्र कार्य आहे` अस्पृश्यता निवारण्याच्या या कार्यासाठी त्यांनी निरनिराळ्यस अस्पृश्यांना संस्थानाच्या नोकरीत सामावुन घेण्यास, त्यांना प्रगतीची संधी देण्यास व सामाजिक प्रतिष्ठा देण्यास सुरूवात केली. त्यांनी महार समाजातील काहींना माहूत म्हणून कामावर घेतले. आपली कन्या राधाबाईसाहेब यांच्या विवाह सोहळ्याच्या वेळी वरातीत सरकारी घोडागाडीवर अस्पृश्य व्यक्तीला कोचमन म्हणून बसविले. महाराजांनी बलुतेदारी व वेठगिरीची पध्दत कायद्याने बंद केली.

**४) हजेरी देण्याची पध्दत बंद :-**

राजर्षी शाहू महाराजांनी अस्पृश्य समजले जाणाऱ्यां लोकांना सन्मानाने जीवन जागता यशवे यासाठी अनेक कायदे केले. त्यातीलच एक महत्वाचा कायदा म्हणजे हजेरी देण्याची पध्दत बंद करण्याचा कायदा होय. त्याकाळी गुन्हेगारी जातीच्या लोकांची हजेरी दररोज पोलीस पाटलांकडे होती. यामुळे या जातीच्या लोकांची मोठी गैरसोय होती. पोलीस पाटील त्यांच्याकडून विना मूल्य काम करून घेत असत. यामुळे त्यांच्या कुटूंबाच्या पोटापाण्याची व्यवस्थाही होत नसे. महाराजांनी ही अडचण दूर करण्यासाठी महार, मांग, रामोशी व बरड या चार जातींच्या लोकांची हजेरी बंद करण्याचा आदेश काढला.

ISBN 978-93-5240-161-1

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



**महार वतन खालसा :-**

राजर्षी शाहू महाराजांनी महारांचे महारकीचे वतन खालसा करून सामाजिक गुलामगिरीतून मुक्त केले. सर्वच महारांचे महारकीचे वतन खालसा करून त्यांच्या जमिनी त्यांच्या नावे करून त्यांची मुक्तता केली.

१९२० मध्ये कोल्हापूर संस्थानातील माणगांव येथे त्यांनी अस्पृश्यांची परिषद भरविली. या परिषदेत त्यांनी डॉ.भिमराव रामजी आंबेडकर यांना अस्पृयांच्या मुक्ती चळवळीचे नेतृत्व करण्यास प्रोत्साहन दिले. नागपूर, दिल्ली येथे भरलेल्या अस्पृश्यांच्या परिषदाचे अध्यक्ष स्थान त्यांनी स्वीकारले

**६) कृषी विकासाला चालना :-**

शेतकरी /कुणबी हा सुध्दा बहुजन वर्गातील असल्यामुळे तो आज्ञानी होता. शिक्षणापासून वंचित असल्यामुळे शेतकरी हा सतत दारिद्र्यात जीवन जगत असे. महाराजांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी त्याकाळी उत्कृष्ट आशा पाणीपुरवठ्याच्या योजना आखल्या बंधारे, तलाव, विहिरी यांच्या माध्यमातून पाणीपुवरठा करण्याच्या योजना आखूण त्या प्रत्यक्षात अमलात आणण्याचे महत्वाचे कार्य केले.

कृषि प्रदर्शने, जनावरांची प्रदर्शने भरविली, शेतातून नवीन पिके काढण्याचे ज्ञान महाराजांनी आत्मसात केले. जंगलांची लागवड केली. शेतकऱ्यांना शेतीचे ज्ञान मिळावे यासाठी गावातील शाळेत व्यवस्था केली. शेती विकासासाठी महाराजांनी परदेशातील तंत्रज्ञान आपल्या संस्थानात स्वीकारले.शेतकज्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी सहकारी पतपेढ्या सुरू केल्या. थोडक्यात शेतकऱ्यांना आज्ञानातुन केवळ बाहेर काढण्याचे काम महाराजांनी केले नाही तर शेतकज्यांचा सर्वांगिण विकास घडवून आणला.

**६) स्त्री शिक्षण :-**

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या कारकीर्दीत समाजातील प्रत्येक अन्यायग्रस्त व्यक्तीला न्याय देण्याचे महान कार्य केले आहे. मनुसमृतीच्या जोखडामध्ये खितपत पडलेल्या स्त्रियांना मुक्त करण्यासाठी महाराजांनी स्त्री शिक्षणाला प्रोत्साहन दिले. बालविवाहास प्रतिबंध केला, विधवा पुनर्विवाहाला कायदेशीर मान्यता दिली, कौटुबिक हिंसाचार प्रतिबंध कायद २ ऑगस्ट १९१९ ला केला, देवदासी प्रतिबंध कायदा करून स्त्रीवर देवाच्या नावावरती होणाऱ्या लैगिंग अत्याचार, अनिष्ठ प्रथावर बंदी घालण्यात आली. जोगीण, मुरळी, भावीन व देवदासी या प्रथांना कायद्याने बंदी घालण्यात आली. स्त्रीयांना शिक्षणासाठी सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या. मुलींसाठी शिष्यवृत्तीची व्यवस्था करण्यात आली.

ISBN 978-93-5240-161-1

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Ta.Sonpeth Dist.Parbhani



मुलांनी उच्च शिक्षण घेता यावे यासाठी राजाराम कॉलेजमध्ये शिकणाऱ्या सर्व मुलींचा उच्च शिक्षण मोफत देण्याची व्यवस्था केली.

**७) आरक्षण विषयक धोरण :-**

राजर्षी शाहू महाराजांनी दि. २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापुर संस्थानात २ टक्के आरक्षणाची घोषणा केली. शाहू महाराजांनी आरक्षणाच्या माध्यमातून शिक्षणाच्या क्षेत्रातील वरिष्ठा वगाच्या मक्तेदारीस शह दिल्यामुळे बहुजन समाजाचे प्रशासकीय सेवेतील प्रमाण लक्षणीय वाढले. बहुजन समाजातील व्यक्तींना उच्च पदावर काम करण्याची संधी मिळाल्यामुळे त्यांचा सामाजिक दर्जा वाढला. त्यांना मान सन्मान व प्रतिष्ठा प्राप्त झाली.

**सारांश :-**

राजर्षी शाहू महाराज हे ब्रिटीशांच्या राजवटीतील एका संस्थानाचे राजे होते. त्यांनी आपल्या बौध्दिक सामर्थ्यावर व जनतेच्या हिताच्या तळमळीतून आपल्या राज्यातील प्रत्येक व्यक्तीला न्याय देण्याचा प्रयत्न केला. तो वास्तवात निर्माण केला. आपल्या स्वातंत्र्य व हक्कापासून वंचित असलेल्या प्रत्येक घटकाचा विकास घडवून आणण्यासाठी विशेष कायदे केले. आपल्या संस्थानातील बहुजन समाजाचा उद्धार करण्याचे महान कार्य राजर्षी शाहू महाराजांनी केले. सद्यस्थितीत लोकशाही शासन व्यवस्था असून ही राजर्षी शाहू महाराजांसारखी कार्यपध्दती राबवली जात नाही. ही आपल्या देशाची शोकांतिका आहे. आज देशात अनेक समस्या आहेत त्या सोडविण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज व राजर्षी शाहू महाराजांच्या दृष्टिकोनातून विचार करण्याची आवश्यकता आहे. परंतू आमचे राज्यकर्ते या दृष्टीकोनातून विचार करतांना दिसून येत नाहीत. मात्र राजर्षी शाहू महाराजांनी प्रतिकूल परिस्थितीत स्त्रीयांसहित सर्व बहुजन समाजाचा उद्धार केला म्हणून राजर्षी शाहू महाराज हे बहुजन समाज उद्धारक आहेत.

**संदर्भ ग्रंथ**


१) भारत वाघमारे संकलीत, राजर्षी शाहू महाराज जीवन आणि शैक्षणिक विचार, प्रबुध्द भारत प्रकाशन, नागपूर..

२) Rajarshi Shahu Maharaj`s thought in २१st century, Editor by Mulgir M.T.

३) राजर्षी शाहू महाराज : सामाजिक सुधारणा व सद्य:स्थिती संपादक प्रा.आर.डी.राठोड


***

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS) College, Sonpeth Dist. Parbhani

ISBN 978-93-5240-161-1